डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , औरंगाबाद

पीएच.डी. (मराठी ) पदवीसाठी सादर करावयाच्या प्रबंधाचे अंतिम प्रारूप.

# "मराठी ग्रामीण कादंबरी वाड्.मयाचा चिकित्सक अभ्यास".

## (कालखंड इ.स. २००० ते इ.स. २०१०)

**अभ्यासक**

श्री. कैलास रायभान दौंड
एम.ए., बी. एड् , नेट

**मार्गदर्शक**

प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे
मराठी विभाग , विवेकानंद महाविद्यालय , औरंगाबाद

**नोव्हेंबर २०१४**

# "मराठी ग्रामीण कादंबरी वाड्.मयाचा चिकित्सक अभ्यास".

## (कालखंड इ.स. २००० ते इ.स. २०१०)

**प्रास्ताविक :-**

मराठी ग्रामीण साहित्यात कादंबरी वाड्.मय प्रकाराचा प्रांत समृध्द आहे. डॉ. आनंद यादव , डॉ. वासुदेव मुलाटे , उध्दव शेळके , रा.रं. बोराडे आदी मान्यवर साहित्यकांनी या प्रवाहाला पाठबळ दिल्याने हा प्रवाह अधिक गतीमान झाला. सती , माऊली , गोतावळा , पाचोळा , धग अशा कादंबऱ्यांनी मराठी वाचकाच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. काळाबरोबर होणारे बदल लेखनात स्वाभाविकपणे येतात. त्यामुळे १९६० नंतरच्या लेखनाचे संदर्भ आणि विषय यात १९९० नंतर बदल होऊ लागले. नव्या बदलाचे , खेड्यातील अस्वस्थ मानसिकतेचे , शेतीच्या उजाडी करणाचे , त्याच बरोबर बाजारीकरणाचे चित्रण तसेच नवी आव्हाने पेलण्याची धडपड करणाऱ्या माणसांचे चित्रण इ.स. २००० नंतरच्या कादंबरीत गेल्या दशकातील कादंबरीत म्हणून आलेले आहेत. त्यामूळे सदर संशोधकाने इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालावधीतील मराठी ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याचा प्रवाह जोमदारपणे आणि जोरकसपणे पुढे आलेला आहे. ग्रामीण कादंबरी याच प्रवाहाचा भाग म्हणून ओळखली जाते. १९६० नंतरच्या कालखंडात म्हणजे भाषावार प्रांतरचनेच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर साहित्यातून लोकजीवन सकलपणे अनुभवास यायला लागले. ग्रामीण कादंबरीमधून याचा अधिक विस्तारीत पट समोर आला. त्यापूढील काळात ग्रामीण साहित्याचा प्रवाह अधिकाधिक विस्तारत गेलेला आहे. इ.स. २००० नंतरच्या कादंबरीकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले असता खाजगीकरण , जागतिकीकरण , गॅट करार , आर्थिक उदारीकरण यामूळे गाव खेड्याचे रूप बदलले आहे. अनेक नविन संकटे ग्रामीण माणसापुढे उभी राहिली आहेत. देश महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत असतांना खेड्यातील माणसाची किमान गरजा भागविण्यासाठीची धडपड चाललेली दिसते. बाजारीकरणामूळे व यांत्रिकीकरणामूळे पशुधन कमी होऊन शेती यंत्राधिष्टीत होत गेली. या खेरीज निर्सगाचा असमतोल इत्यादीमूळे नाडल्या गेलेलया शेतकरी जिवनाचे चित्रण करणारी कादंबरी याच कालखंडात दिसते.

आज घडीला २१ वे शतक सुरू होऊन जवळपास दिड दशकाचा कालखंडही लोटला आहे. या दशकातील ग्रामीण कादंबरीचा आढावा घेऊन तिचे स्वरूप समाजावून घेणे व चिकित्सक अभ्यास करणे

निश्चितच कालसूसंगत होते. आजच्या काळाची स्पंदने या ग्रामीण कादंबरीत उमटतात की नाही. या सोबत कलात्मगुणाचे भान तिच्यात कितपत राखले गेलेले आहे. याचा देखिल अभ्यास केलेला आहे. संख्या व गुणांच्या दृष्टीनेही कादंबरी नेमकी किती आणि कोठे आहे. याचा ही चिकित्सक अभ्यास करण्यात आलेला आहे.

ज्या ग्रामीण साहित्यिकांच्या कादंबऱ्या इ.स. २००० नंतर प्रथमच प्रकाशित झाल्यात असे नवे कादंबरीकार त्यांच्या लिखाणातील परिणामकारकतेमूळे लक्ष वेधून घेतांना दिसतात. त्यात भारत काळे , सुरेंद्र पाटील , अशोक कोळी , कृष्णात खोत , कैलास दौंड , बालाजी मदन इंगळे या व अशा आणखी काही लेखकांचा यात सामावेश आहे. या शिवाय सदानंद देशमुख , गणेश आवटे , बाबाराव मुसळे , सरदार जाधव , विश्वास पाटील , आनंद यादव , वासुदेव मुलाटे , रा.रं. बोराडे हे पूर्वी पासून लेखन करणारे साहित्यिकही इ.स. २००० नंतर लेखन करीत आहेत. त्यांच्या लेखनातील बदल शोधण्याचे देखिल काम केलेले आहे.

## विषय निवडी मागील भुमिका :-

आजच्या मराठी वाड्.मयात ग्रामीण साहित्याचा प्रांत अधिकाधिक विकसीत आहे. १९६० नंतरच्या काळात विविध टप्यात ग्रामीण कादंबरीने वाचकांना आणि जनसामान्यांना भुरळ घातली आहे. ग्रामीण कादंबरी हा समीक्षकांनी आणि साहित्यिकांनी देखिल मान्य केलेला साहित्य प्रकार आहे. इ.स. २००० ते इ.स. २०१० हा काळाचा एक मोठा दशवार्षिक तुकडा असून हा अगदीच नजिकचा काळ आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा आजवरचा सर्वाधिक वेग याच दशकाने पाहिलेला आणि साहिलेला आहे. महासत्तेच्या दिशेने निघालेल्या मराठी भाषेत कादंबरीकारांना ग्राम व्यवस्थेत होत असलेल्या स्थित्यंतराचे , ग्राम जीवनाचे कितपत भान आहे ? हे शोधणे महत्त्वाचे होते. एकूणच ग्राम व्यवस्थेतील बदल कादंबरीकारांना कितपत पेलवतो ? समाजाची मानसिकता त्यांच्या लेखणातुन प्रगट होते का ? हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे होते. त्याचप्रमाणे कादंबरीकारांनी दाखवलेली प्रयोगशिलता , पारंपरिकता , भाषिक प्रयोग , विषयाचा आवाका या सर्वांच्या संदर्भाने इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करणे अत्यंत कालसुसंगत व महत्त्वाचे होते.

इ.स. २००० नंतरच्या काळात पूर्वीपासूनच कादंबरी लेखन करणाऱ्या कादंबरीकारांची कादंबरी या काळात नेमकी कशी आणि कोठे आहे. याचबरोबर नव्यानेच लेखन करणाऱ्या कादंबरीकारांची भूमिका आणि त्यांचे कादंबरीलेखन पुर्वासूरींच्या तुलनेत कसे आहे. हे पाहण्यासाठी सदर संशोधनाचा निश्चितच

उपयोग होईल. इ.स. २००० ते इ.स. २०१० या काळातील मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप , वैशिष्टे , सामर्थ , वेगळेपण , सौंदर्य मर्यादा याचा अभ्यास सदर संशोधनात केलेला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

सदर संशोधन करतांना संशोधकाने पुढील उद्दिष्टे नजरे समोर ठेवली होती.

१. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचे वेगळेपण शोधण्यात येणार आहे.
२. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचे वैशिष्टे शोधण्याचा मानस आहे.
३. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप निश्चित करणे.
४. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचे एकूणच मराठी कादंबरीत स्थान निश्चीत करणे.
५. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबऱ्याच्या सामर्थ्य व मर्यादांचा शोध घेण्यात येईल.
६. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरी वाङ्.मय प्रकारातील निवडक साहित्यकृतीची चिकित्सा केली जाईल.

या खेरीज प्रत्यक्ष संशोधन करतांना संशोधकाला आवश्यक वाटणाऱ्या

१. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीतील सौदर्यंतत्त्वाचे स्वरूप शोधणे.
२. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीतील नात्यांचे स्वरूप शोधणे.

अशा आणखी काही उद्दिष्टांचा सामावेश केलेला आहे. ही उद्दिष्टे साध्य झालेली आहेत .

## शोध प्रबंधाचे प्रारूप :-

यापूर्वी झालेल्या संशोधनात प्रा.डॉ. भास्कर शेळके , शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर यांनी डॉ. आनंद यादव यांच्या मार्गदर्शनाखाली इ.स. १९४० ते इ.स. १९९० या कालखंडातील मराठी

कादंबऱ्यातील प्रादेशिकता हा प्रबंध पुणे विद्यापीठात सादर करून पीएच.डी. पदवी मिळविली आहे. त्याच प्रमाणे श्री. लक्ष्मण पिलाजी तांबे यांनी ' साठोत्तरी मराठी कादंबरीतील सामाजिक बांधीलकीचे चित्रण (इ.स. १९६० ते इ.स. २००३ पर्यंतचा कालखंड) ' या विषयावर डॉ. पंडीत भीमराव टापरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे पीएच.डी. संशोधन केलेले आहे. त्या खेरीज ' मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री प्रतिमा (इ.स. १९६० ते इ.स. १९९०) ' या विषयावर संचिता किशनराव राऊत यांनी डॉ. नागनाथ हेगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे पीएच.डी. पदवीसाठी संशोधन केलेले आहे. तात्पर्य इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरी वाङ्.मयाचा चिकित्सक अभ्यास या विषयावर अन्यत्र संशोधन झालेले नाही. संशोधनाच्या दृष्टीने हा विषय सर्वार्थाने नवीन होता.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने काही उद्दीष्ट्ये निश्चित केली होती. त्यानुसार संशोधन कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचे वेगळेपण शोधण्यात आले. या कालखंडातील ग्रामीण कादंबरीची वैशिष्ट्ये शोधण्यात आली. ग्रामीण कादंबरीचे स्वरूप व एकूण स्थान निश्चित करण्यात आले. त्याच बरोबर संशोधन कालखंडातील निवडक मराठी कादंबऱ्यांच्या सामर्थ्य आणि मर्यादांचा शोध घेण्यात आला आणि महत्त्वाच्या निवडक साहित्य कृतीची चिकित्सा केली गेली.

हे करतांना अभ्यासाची मांडणी प्रकरणशः पुढील प्रमाणे करण्यात आली.

**प्रकरण पहिले :** इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीची पार्श्वभूमी

**प्रकरण दुसरे :** इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरीकार आणि कादंबरी.

**प्रकरण तिसरे :** इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे स्वरूप.

**प्रकरण चौथै :** इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यातील बदलत्या वास्तवाचे चित्रण.

**प्रकरण पाचवे :** इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीची समीक्षा.

**प्रकरण सहावे :** उपसंहार.

वरील प्रकरणात संशोधन विषयाचा सांगोपांग अभ्यास करून संशोधन फलीत मांडलेले आहे. संशोधन कालखंडातील ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण पहिले : इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीची पार्श्वभूमी**

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीची पार्श्वभूमी शोधण्यात आलेली आहे. एकूणच कादंबरी आणि ग्रामीण कादंबरीची पार्श्वभूमी शोधण्यात आलेली आहे. इ.स. १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचा आढावा घेतल्यानंतर इ.स. १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीचा आढावा घेण्यात आलेला आहे. या काळात मोहन पाटील , विश्वास पाटील , नामदेव चं. कांबळे , रंगनाथ पठारे , भीमराव वाघचौरे , बाबा भांड , राजन गवस , सदानंद देशमुख , सुरेश द्वादशंवार , ता.रा. पाटील , प्रतिमा इंगोले , बाबाराव मुसळे , राजन खान आदी कादंबरीकारांनी महत्त्वपूर्ण कादंबरी लेखन केलेले आहे.

त्यानंतर इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडात झालेले ग्रामीण समाजजीवनातील बदल टिपण्यात आलेले आहेत. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण समाजवास्तवाचे चित्रण करणाऱ्या 'चाळेगत' 'भिरूड' , 'जोहड', 'इथं होतं एक गाव' , 'बखर एका खेड्याची' , 'पाटीलकी' , 'वारूळ' , 'धूळपेरणी' , 'ऐसे कुणबी भूपाळ' , 'गावठाण' , 'पाणधुई' , 'हिरवा डोंगर' , 'गव्हाणी' , 'उचल' , 'धूळपावलं' , 'रौंदाळा' , 'पाडा' , 'कापूसकाळ', 'निशाणी डावा अंगठा' , 'चिखलवाटा' , 'डेअरी' , इत्यादी पन्नासहून अधिक कादंबऱ्यावर झोत टाकण्यात आलेला आहे.

इ.स. २००० नंतर समाजात आपण २१ व्या शतकात गेल्यामुळे प्रगतीची भावना निर्माण झाली. या काळात समाजात सामाजिक , आर्थिक , राजकीय , माहिती तंत्रज्ञान , शैक्षणिक असे विविधस्तरीय बदल झालेले आहेत. इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडात लिहिल्या गेलेल्या मराठी ग्रामीण कादंबऱ्यामध्ये 'धूळपेरणी' , 'जोहड' , 'भिरूड' , 'बारदाना' , 'बारोमास' , 'चाळेगत' , 'गावठाण' , 'पांढर' , 'कापूसकाळ' , 'झिम पोरी झिम' , 'दात' , 'भाऊबंद' , 'धूळपावलं' , 'निशाणी डावा अंगठा' , 'इच्छामरण' , 'बुझ्र्वागमन' , 'गव्हाणी' , 'पाटीलकी' या सारख्या कादंबऱ्या महत्त्वाच्या ठरतात.

**प्रकरण दुसरे : इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरीकार आणि कादंबरी.**

प्रकरण दोन मध्ये इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील निवडक मराठी कादंबरीकार आणि कादंबरी याचा मागोवा घेण्यात आलेला आहे. राजन गवस , सदानंद देशमुख , डॉ. भीमराव वाघचौरे , बाबाराव मुसळे , सरदार जाधव , आनंद पाटील , प्रतिमा इंगोले , किशोर सानप , भालचंद्र देशपांडे , रा.रं. बोराडे , सुरेखा शहा , रवींद्र शोभणे , शेषराव मोहिते , बालाजी मदन इंगळे , बाळासाहेब गर्कळ , दि.र.जायभाये , रमेश इंगळे उत्रादकर , दिवाकर चौधरी , प्रवीण दशरथ बांदेकर , अशोक कौतिक कोळी , विश्वास पाटील , रंगनाथ पठारे , आनंद यादव , डॉ. जनार्धन वाघमारे , शंकर सखाराम , साईनाथ पाचारणे , कैलास दौंड , जयवंत ज्ञानु अवघडे , महेंद्र कदम , माधव कोंडविलकर , नामदेव कांबळे , रावजी राठोड आदी कादंबरीकारांचा परीचय या प्रकरणात देण्यात आलेला असून या कालखंडातील निवडक मराठी कादंबऱ्यावर एक दृष्टीक्षेप टाकण्यात आलेला आहे.

इ.स. २००० नंतरच लिहीत्या झालेल्या कादंबरीकारांच्या 'पाडा' , 'कुंधा' , ' गावठाण' , 'रौंदाळा' , 'ऐसे कुणबी भूपाळ' , 'धूळपावलं' , 'पाणधूई' , 'कापूसकाळ' , ' चाळेगत' , 'झिम पोरी झिम' , 'निशाणी डावा अंगठा' अशा कादंबऱ्यांचा स्वतंत्रपणे विचार केलेला असून या कालखंडातील ग्रामीण कादंबरीतील आशय आणि मांडणीचे स्वरूप पाहण्यात आलेले आहे. इ.स. २००० पूर्वीपासून कादंबरी लेखन करणाऱ्या कादंबरीकारांच्या लेखनात त्या पुढील काळात झालेले बदल संशोधनात टिपण्यात आलेले आहेत. एकूणच इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीच्या पूर्वीच्या कादंबरीहुन असणाऱ्या वेगळेपणाचा शोध घेतला गेलेला आहे. अशा वेगळेपणाचा शोध घेत असतांनाच संशोधकाने या कादंबरीचे पूर्वीच्या कादंबरीशी असणारे साम्य देखील शोधलेले आहे. उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबरीमध्ये ग्रामीण भागातील नव्या प्रश्नांचेही दर्शन घडते.

**प्रकरण तिसरे : इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे स्वरूप.**

तिसऱ्या प्रकरणामध्ये इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे स्वरूप विशद केलेले आहे. त्यात संशोधन कालखंडातील ग्रामीण कादंबरीच्या स्वरूपा बरोबरच कादंबरीतील जीवनसंघर्ष , मूल्यसंघर्ष , राजकीय चित्रण यांचा देखील वेध घेण्यात आलेला आहे. याच कादंबऱ्यामध्ये स्त्री व्यक्तिरेखांचे चित्रण , ग्रामीण बदलाचे चित्रण , या कादंबऱ्यामधील आशयाची व्यापकता , या कादंबऱ्यांचे वेगळेपण आणि निवडक विशेष याचा शोध घेतलेला आहे.

संशोधन कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीने शेती आणि परंपरागत शेतकरी जीवनाचे दर्शन घडवितांनाच ग्रामीण जीवनाच्या विविध पैलूंचे चित्रण केलेले आहे. ग्रामीण कादंबरीमध्ये ग्रामीण जीवन संघर्षाचे चित्रण झालेले आहे. बेकारी आणि कृषी संस्कृतीची पडझड यामुळे या जीवन संघर्षाला जोरकसपणा आलेला दिसतो. त्याच बरोबर या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये परंपरागत मूल्ये आणि नवी मूल्ये यामधील संघर्ष समोर येतो. शास्वत मानवी मूल्ये जपतांना सामान्य माणसे हतबल होत असल्याचेही या कालखंडातील कादंबरीतून समोर येते.

इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीमधून दिसणाऱ्या राजकीय चित्रणातून राजकीय आरक्षण , त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती , गावातील गट , तट , सोसायटीच्या निवडणुका , विविध जातींच्या संघटना , राजकीय कारखानदार लोकांकडून होणारी शेतकऱ्यांची अडवणुक , निवडणुकीत पैशाला आलेले महत्त्व , तंटामुक्त गाव मोहिमेत गावाने सहभाग घेतल्यानंतर गावातील काही लोकांनी स्वार्थी वृत्तीने घेतलेली विरोधी भूमिका , एसईझेड सारख्या प्रश्नांचे राजकारण आणि नैसर्गिक साधन सामुग्रीच्या लुटीबाबत राजकारणीचे मौन अशा अनेक बाबी अधारेखित होतात.

संशोधन कालखंडातील ग्रामीण कादंबरी मधील स्त्री जीवनाचे चित्रण वास्तवदर्शी झाले असून 'बोडखी' , 'भूवैकुंठ' , 'गावठाण' , 'झिम पोरी झिम' या कादंबऱ्यातील मुख्य व्यक्तिरेखा स्त्रीच आहेत. ग्रामीण शेतकरी स्त्रीचे चित्र उभे करणारे चित्रण या कालखंडातील ग्रामीण कादंबरीतून दिसते. दारिद्र्याशी झगडणारी भूवैकुंठ मधील कौशल्या गोंधळे आणि अंगारकूस मधील कॅन्सरशी झुंज देणारी आक्का या व्यक्तिरेखाही लक्षवेधी झालेल्या आहेत. वास्तवातील आजच्या ग्रामीण स्त्रीच्या जवळपास जाणारे स्त्रीव्यक्तीरेखांचे चित्रण जवळपास सर्वच ग्रामीण कादंबऱ्यातुन निश्चितपणे आढळते.

या कालखंडातील ग्रामीण बदलाचे येणारे चित्रण राजकीय आरक्षण आणि त्यामूळे मागासवर्गीयांना मिळू लागलेली सरपंच , पोलीस पाटील अशी पदे त्यामुळे कोणीतरी प्रस्तापितांनेच अशा घटकातील लोकांना प्यादे बनवुन पुढे करण्याची प्रवृत्ती 'पाटीलकी','रौंदाळा','झगडा' अशा काही कादंबऱ्यांनी पकडलेली आहे. हायब्रीड पिकाची सुरूवात , बियाण्यातील बणवेगिरी पकडण्याचाही प्रयत्न कादंबऱ्यांतून झालेला आहे. शेतकरी संघटनेला येणारे अपयश , बेकारी , गावातील वाढते राजकारण , शिक्षण व्यवस्थेचा उडालेला बोजवारा , गावातील सुधारणांना गावातील लोकांकडूनच होणारा विरोध , सागरी तस्करी , खाणकाम , जमीनीचे अधिग्रहण , एसईझेड प्रकल्प हे बदलही उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबरीने नेमके पकडलेले आहेत. मात्र अनेक कादंबऱ्यातून ग्रामीण बदलाचे चित्रण येत नाही.

उदा. 'इथं होत एक गाव' , 'हिरवा डोंगर' , 'ऐसे कुणबी भूपाळ' , 'संभुती' , 'हौशा', 'चिखलवाटा' , 'भुवैकुंठ' , 'तळतळाट' , 'दात' , 'बोडखी' , 'कुंधा' , 'अंगारकुस' , 'झिम पोरी झिम' , 'उचल' , 'सरपंच' , 'आरंबळ', 'वळणाचं पाणी' .

उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यांनी आशयाच्या आणि कथानकाच्या बाबतीत व्यापकता दाखवलेली दिसते. तसेच ही कादंबरी आधिच्या कालखंडातील कादंबरीपेक्षा निश्चितच वेगळी आहे. त्यामुळेच या कादंबरीचे आशयाचे व्यापक स्वरूप , प्रयोगशिलता , कळीच्या प्रश्नांना हात घालण्याची तयारी , भाषिक वापराचे प्रयोग , विशिष्टतेला महत्त्व , कृषी जीवनदर्शनाचा अभाव , राजकीय परिवर्तनशिलतेचे चित्रण , ग्रामीण प्रश्नांची मांडणी व दृश्यात्मकतेत वाढ असे काही विशेष सांगता येतात.

**प्रकरण चौथै : इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यातील बदलत्या वास्तवाचे चित्रण.**

प्रकरण चार मध्ये इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीमध्ये आलेले बदलत्या कृषी वास्तवाचे चित्रण करण्यात आलेले आहे. ग्रामीण कादंबऱ्यातून येणाऱ्या कृषी दर्शनाचे स्वरूप विविधांगी आणि प्रभावी असून तरीही ते मर्यादीत स्वरूपात घडणारे आहे. शेती कामे , दुष्काळ यांचे चित्रण या कालखंडातील ग्रामीण कादंबरीमध्ये दिसते. बदलत्या कृषी जीवनाचे दर्शन गारपीट , पाऊस , अशी नैसर्गिक संकटे , तुषार सिंचन , शेडनेट , ग्रीन हाऊस , कलम , छोटी शेती , शेत रस्ते , जनरेटर , शेत तळे , पशुधन , इलेक्ट्रीक मोटारीचा वापर , दुध भेसळ , अन्न धान्य भेसळ , कांदे लावणे आदी बदलत्या बाबीचे चित्रण उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबरीत येत नाही. कृषी जीवनातील बदल या कालखंडातील कादंबरीने फारसे विस्ताराने आणि तपशीलात जाऊन टिपले नसल्याचे दिसते. ग्रामवास्तवाचे चित्रण मात्र या कादंबऱ्यात आढळते. ग्रामीण मानसिकतेचे चित्रण कसे आहे? याचा वेध घेतांना एखाद दुसरा अपवाद वगळता इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबऱ्यामधील व्यक्तिरेखा ग्रामीण मानसिकता सांभळणाऱ्या आहेत असे दिसते.

कादंबरी वाङ्.मय हे कल्पीत आणि लेखकाच्या गाठीला असणाऱ्या अनुभवाच्या वास्तवाचे कलात्मक मिश्रण असते. कादंबरीमधून उभी राहणारी सृष्टीही कादंबरीकाराच्या विचाराचे आणि चितंनाचे प्रतिबींब असते. कधीकधी साहित्यकृतीतून तो वर्तमान आणि भविष्याचा वेधही घेत असतो. त्यामूळे ग्रामीण कादंबरीतुन शिक्षण , बेकारी , गावपातळीवर वाढत चाललेली अशांतता , तुटलेपण , हुंड्यासारखा प्रश्न , आरोग्य , कर्जबाजारीपणा , तंटा मुक्त गावातील तंटे , जात वार संघटना , गाव पातळीवरील जत्रा -

यात्रात भांडणे काढण्याची वृत्ती प्रवृत्ती , शिकलेल्या अपत्याचे घरापासुन तुटत जाणे , एसईझड सारखा शेत जमीनी गिळंकृत करणारा पेच , मजुराधारीत शेतीचा वाढता खर्च , भूमी अधिग्रहित करणारी धोरण , परप्रांतीय मच्छिमारांची घुसखोरी , अतिरीक्त उसाचा प्रश्न , दुष्काळ व त्याची मानव निर्मीत तीव्रता , शेती सोडून शहराकडे स्थलांतर , हार्वेस्टरने ऊस तोडणी , केळी - कापूस विक्रीचा प्रश्न , आरक्षणामुळे मागास जाती - जमातीतील व्यक्तिंना प्यादे बनविण्याचा प्रकार , स्त्रीयांच्या आरोग्याचा प्रश्न , पाणी टंचाई , सावकारकी , दारिद्रय अशा काही प्रश्नांची मांडणी उपरोक्त कालखंडातील कादंबऱ्यामधुन झालेली आहेत. या कादंबऱ्यामध्ये कादंबरीकारांनी केलेले निरीक्षण , चिंतन आणि वास्तव यांच्या कलात्म मिश्रणातुन निर्माण झालेले समाज वास्तव ग्रामीण कादंबरीमध्ये आढळुन येते. त्यामुळे समाजजीवना.बरोबरच समाजिक अभिसरण देखिल कळायला मदत होते.

इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीतील सौदर्यतत्त्वाचे स्वरूप हे चित्रणातील सुक्ष्मता , घटना प्रसंगातील बारकावे , व्यक्तिरेखांचे प्रभावी व परिणामकारक चित्रण आणि काही प्रमाणत भाषा यावरआधारलेले आहे. कादंबरी या वाड्.मय प्रकाराचा विचार करता ती संख्येने अधिक व दखल पात्रही ठरलेली दिसते. संख्या आणि गुणवत्ता यासह मराठी ग्रामीण कादंबरीने एकूणच कादंबरी वाड्.मयाचा आवाका वाढवायला मदत केलेली दिसुन येते.

**प्रकरण पाचवे : इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीची समीक्षा.**

पाचव्या प्रकरणामध्ये इ.स. २००० ते इ.स. २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीची समीक्षा करण्यात आलेली आहे. त्या अंतर्गत या कालखंडातील कादंबऱ्यामधील आशय व कथाबंधाचे स्वरूप , भाषाशैली , नेमकेपणा , व्यक्तिरेखा , कादंबरीतील भावनांचे दर्शन , व्यक्तिरेखांची मनोभूमिका , कादंबरीतील घटनांचे स्वरूप , नात्यांचे स्वरूप , कादंबरीतील संवादाचे स्वरूप , ग्रामीण कादंबरीची एकूणच परिणामकारकता , ग्रामीण कादंबरीची बलस्थाने , या कालखंडातील ग्रामीण कादंबरीची मर्यादा या मुद्यांच्या आधारे संशोधन कालखंडातील कादंबरीची वस्तूनिष्ठ समीक्षा करण्यात आलेली आहे.

रचनातंत्राचा विचार करता ग्रामीण कादंबरीमध्ये पारंपरिक रचनातंत्राचा प्रभाव दिसत असला तरी रचनातंत्राच्या दृष्टीने काही प्रयोग करण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. आशय आणि कथाबंधाचे कादंबऱ्यामधील स्वरूप बहुतांशाने पारंपरिक पध्दतीचे आहे. काही नवे प्रश्नही या कालखंडातील कथाबंधातुन समोर येतात. एकूणच आशय आणि कथाबंधाचे स्वरूप वास्तवाला संवादी आहे.

या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीच्या निवेदनामध्ये प्रमाणभाषेच्या वापरा सोबतच बोलीभाषा वापराचे यशस्वी प्रयोग 'कुंधा','पाडा','बुझर्वागमन','धूळपेरणी' यासारख्या काही कादंबऱ्यांतून झालेले दिसतात.

उपरोक्त संशोधन कालखंडामधील ग्रामीण कादंबऱ्यामध्ये घटना , प्रसंग , कथानक , व्यक्तिरेखा, वातावरण निर्मीती या घटकांमध्ये नेमकेपणा असणाऱ्या आणि नेमकेपणा नसणाऱ्याही कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. त्यात नेमकेपणा साधला गेलेल्या कादंबऱ्यांची संख्या अधिक असल्याचे दिसते.

उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा पाहता व्यक्तिरेखांचे चित्रण परिणाम कारकतेने करण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला दिसतो. व्यक्तिरेखांच्या सुनियोजीत वापरामुळे परिणामकारकता वाढीस लागली आहे. 'बारोमास' , 'बारदाना' , ' चाळेगत' , 'कुंधा' , 'कापूसकाळ' , 'रौंदाळा' अशा काही कादंबऱ्यात व्यक्तिरेखांची संख्या अधिक असल्याचे दिसते. 'गराडा' , 'इच्छामरण' , 'डेअरी' अशा काही कादंबऱ्यात कमी व्यक्तिरेखा आहे. तर काही कादंबऱ्यांमध्ये प्राणी व्यक्तिरेखांचा वापर करण्याचा प्रयत्न झालेला दिसत असला तरी तो फारसा प्रभावी झालेला नाही. एकुणच या कालखंडातील व्यक्तिरेखांचे चित्रण स्पष्ट व अस्पष्ट अशा मिश्र स्वरूपाचे दिसते.

कादंबरीतील भावनांच्या दर्शनाचे स्वरूप देखील पाहिलेले असून त्यामुळे कादंबरीत जीवंतपणा येतांना दिसतो. ग्रामीण कादंबरीतील व्यक्तिरेखांची मनोभूमिका सुष्ट , दुष्ट व समिश्र प्रकारची असल्याचे दिसते. अनेक पात्रांची मनोभूमिका अगतीक असल्याचेही दिसते. तर काही व्यक्तीरेखा प्रगतशील मनोवृत्ती असलेल्या आढळतात.

या कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यामधील घटनांचे स्वरूप पाहता ते बहुतांश प्रमाणात कथानकाला गती देण्या बरोबरच आशयाशी , मूळ घटकाशी संवादी राहिलेले दिसते.

संशोधन कालखंडातील ग्रामीण कादंबरीमध्ये नात्याचे स्वरूप शोधतांना पती , पत्नी , आई-वडील, मुले , भाऊ किंवा बहिण-भाऊ , दिर - जावा , भावजय , सासु - सासरे , चुलते , चुलत भाऊ , आजी - आजोबा अशा नात्यांचे दर्शन घडत असतांना त्यातील दृढत्त्व काहीसे सैल झालेले लक्षात येते. समाजामधील नात्यात घडणाऱ्या अभिसरणाचेच प्रतिबींब या कादंबऱ्यात पडलेले आहे. कादंबऱ्यातील संवाद देखील कथानकाची गरज म्हणुन गती वाढवणारे , व्यक्तिमत्त्वाचे पैलु खुलवणारे म्हणुनच परिणामकारक झाले आहेत. काही कादंबऱ्यामध्ये काहीना काही घटक बलस्थानी आहेत. त्याचा येथे

आढावा घेतलेला आहे. पुरेसे चितन आणि आशय यासाठी लागणारे विषयज्ञान, समाजभान आणि भाषाभान , स्वतःचा दृष्टीकोन यांच्या कमतरतेमुळे बहुतांश ग्रामीण कादंबरीने स्वतः भोवती मर्यादा घालुन घेतल्याचे दिसते.

वरील पाचही प्रकरणाचा आणि साधन ग्रंथ म्हणून वापरलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता खालील प्रमुख निष्कर्ष नोंदवता येतात.

१. मराठी कादंबरी वाङमय प्रकारामध्ये मराठी ग्रामीण कादंबरी हा उपप्रकार रूढ आहे.

२. 'पिराजी पाटील' ही १९०३ मध्ये प्रकाशित झालेली ग्रामीण कादंबरी मानली जाते.

३. इ.स.१९६० नंतरच्या कालखंडात मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवाह अधिक जोरकस झालेला आढळतो.

४. इ.स.१९६० नंतरच्या कालखंडात मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये 'फकिरा' , 'धग' , 'माझा गाव' , 'टारफूला' , 'इंधन' , 'पाचोळा' , 'गोतावळा' , 'गांधारी' , 'मंधान' , 'इजाळ' , 'कुणाच्या खांदयावर' , 'बगाड' , 'गणगोत' , 'हाल्या हाल्या दुधू दे' , ' चौंडक' , 'गांधारीचे डोळे' , 'मध्यरात्र' , 'कागुद आणि सावली' , 'मेड इन इंडिया' , 'झोंबी' , 'झेलझपाट' , 'विषवृक्षाच्या मूळया' , 'पाचर' , 'बहिष्कृत' , 'शापित ', या कादंबऱ्या महत्वाच्या ठरतात.

५. इ.स. १९९० नंतर समाज जीवनात काही बदल झाले.

६. इ.स.१९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये 'झोंबड' , 'लिगाड आणि खांदेपालट' , 'झाडाझडती' , 'तणकट' , 'तहान' , 'हाकूमी' , 'धिंगाणा' , 'बुढाई' , 'असं जगणं तोलाचं' 'पखाल ', 'हयात आणि मजार' , 'डाळं' , 'बस्तान' या कादंबऱ्या महत्वाच्या ठरतात.

७. इ.स. २००० नंतर समाजात आपण २१ व्या शतकात गेल्यामूळे प्रगतीची भावना निर्माण झाली. या काळात समाजात सामाजिक , आर्थिक , राजकिय , माहिती तंत्रज्ञान , शैक्षणिक असं विविध बदल झाले.

८. इ.स.२००० ते इ.स.२०१० या कालखंडात मराठी ग्रामीण कादंबरी लिहीली गेली.

९. इ.स.२००० ते इ.स.२०१० या कालखंडात लिहिल्या गेलेल्या मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये 'धूळपेरणी' , 'जोहड' , 'भिरूड' , 'बारदाना' , 'बारोमास' , ' चाळेगत' , 'गावठाण' , 'पांढर' , 'कापूसकाळ' , ' झिम पोरी झिम' , 'दात' , 'भाऊबंद' , 'नामदार श्रीमती' , 'धूळपावल' , 'निशाणी डावा अंगठा' , 'पाडा' , 'कुंधा' , 'एसईझेड' , 'रौंदाळा' , 'चिखलवाटा' , 'इच्छामरण' , 'बुर्झ्वागमन' , 'गव्हाणी' , 'पाटीलकी' यासारख्या कादंबऱ्या महत्वाच्या ठरतात.

१०. इ.स.२००० ते इ.स.२०१० या नव्या शतकातील पहिल्या दशकात प्रकाशित झालेल्या मराठी ग्रामीण कादंबऱ्यांचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली.

११. इ.स.२००० च्या पूर्वीपासून कादंबरीलेखन करणाऱ्या कादंबरीकारांपैकी काही कादंबरीकारांनी त्यापुढील काळातही ग्रामीण कादंबरीचे लेखन केले आहे. तर

१२. इ.स.२००० च्या पूर्वीपासून कादंबरी लेखन करणाऱ्या कादंबरीकारांपैकी काही कादंबरीकारांच्या इ.स.२००० ते इ.स.२०१० या कालखंडात नवीन कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या नाहीत.

१३. इ.स.२००० नंतर नव्यानेच कादंबऱ्याही संशोधनाच्या कालखंडात प्रकाशित झालेल्या आहेत.

१४. इ.स.२००० च्या पूर्वीपासून ग्रामीण कादंबरीचे लेखन करणाऱ्या कादंकारीकारापैकी काही कादंबरीकारांच्या लेखनात त्यापुढील काळात बदल झालेले दिसतात.

१५. उपरोक्त कालखंडामध्ये लिहिली गेलेली मराठी ग्रामीण कादंबरी लक्षणिय आणि दखलपात्र आहे.

१६. उपरोक्त कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचे काही स्वरूप विशेष ठळकपणाने सांगता येतात.

१७. या कालखंडातील कादंबऱ्यांचे पूर्वीच्या ग्रामीण कादंबऱ्यांहून काही वेगळेपणही दिसते.

१८. त्याच प्रमाणे इ.स. २००० ते इ.स.२०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यांचे पूर्वीच्या ग्रामीण कादंबरीशी काही प्रमाणात साम्य दिसते.

१९. उपरोक्त कालखंडात पूर्णपणे बोली भाषेत काही कादंबऱ्या लिहील्या गेल्या आहेत.

२०. उपरोक्त कालखंडातील काही कादंबऱ्यांतून खेडयातील राजकारणाचे प्रभावी चित्रण येते.

२१. एकेका पिकाचे चित्रण करणाऱ्या काही कादंबऱ्या उपरोक्त कालखंडात लिहील्या गेल्या आहेत.

२२. याच कालखंडातील काही कादंबऱ्यांतून राजकिय आणि सामाजिक आरक्षणांचे चित्रण येते.

२३. ग्रामीण स्त्री जीवनाचे आणि तिच्या आरोग्याचे चित्रण देखील उपरोक्त कालखंडातील काही कादंबऱ्यांमध्ये येते.

२४. उपरोक्त कालखंडातील काही कादंबऱ्यांना दुष्काळाच्या प्रश्नाचे चित्रणही प्राधान्याने येते.

२५. उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबरीमध्ये ग्रामीण भागातील नव्या प्रश्नांचेही चित्रण येते.

२६. शेतीच्या कामाचे किंवा कामातील बारकाव्याचे चित्रण उपरोक्त कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीत अभावानेच ते आढळते.

२७. उपरोक्त कालखंडातील अनेक ग्रामीण कादंबऱ्यांत गावपातळीवरील राजकिय चित्रण येते. उदा. 'रौंदाळा' , 'कुंधा' , 'पाटीलकी' , 'कापूसकाळ', 'गोठण' इत्यादी.

२८. वरील कालखंडात संपूर्ण बोलीभाषेत लिहील्या गेलेल्या काही कादंबऱ्या आढळतात. उदा. 'गावठाण', 'कुंधा' , 'बुझ्र्वागमन' , 'झिम पारी झिम इत्यादी'.

२९. या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीतील संवादाची भाषा ही गावपातळीवर वापरली जाणारी ग्रामीण भाषाच आहे. उदा.बारोमास , दात , कापूसकाळ इत्यादी

३०. सेझ , परप्रांतीयांची घुसखोरी , निसर्गाची ओरबाडणूक करणाऱ्या धोरणांना पाठींबा देणाऱ्या प्रवृत्तींना काही ग्रामीण कादंबऱ्यातून स्पर्श झालेला आहे. उदा. 'एसईझेड', ' चाळेगत'.

३१. या कालखंडातील मराठी ग्रामीण कांदबरीतून स्त्री जीवन आणि त्यांची घुसमट व्यक्त झालेली आहे. उदा. 'गावठाण' , 'झिम पोरी झिम' , 'अंगारकूस' , 'भूवैकुंठ'.

३२. राजकिय व सामाजिक आरक्षणाने निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांचे चित्रण देखील काही कादंबऱ्यांत झालेले आहे. उदा. 'पाटीलकी' , ' झगडा' , 'धूळपावलं 'इ.

३३. दुष्काळ , नापिकी , बेकारी , दीर्घकालीन उपाययोजनांचा अभाव अशा विषयांनाही मराठी ग्रामीण कादंबरीने स्पर्श केलेला आहे. उदा. 'भूवैकुंठ ', ' पांढर' , 'बारोमास ',

३४. या कालखंडात केवळ कुटूंबकथा असे स्वरूप असलेल्याही काही कादंबऱ्यांचेही लेखन झालेले आहे. उदा. 'बारदाना ', 'अंगारकूस' , 'चिखलवाटा' , 'इच्छामरण'.

३५. या कालखंडात एकेका पिकाच्या संबंधाने कादंबरी लेखन झालेले आहे. उदा.पाडा , कापूसकाळ , रिक्त अतिरिक्त , साखरफेरा.

३६. शिक्षणाच्या सदयस्थितीवर प्रकाश टाळणाऱ्या कादंबऱ्यांही या कालखंडात लिहील्या गेल्या आहेत. उदा. 'हाताची घडी, तोंडावर बोट ' , 'निशाणी डावा अंगठा ' .

३७. शेता शिवारातील वर्णने विस्ताराने येत नसली तरी शेतकरी कुटूंबातील जगण्याचे चित्रण काही कादंबऱ्यांतून प्रभावीपणाने आलेले आहे. उदा. 'बारोमास' , 'चिखलवाटा' , 'कापूसकाळ'.

३८. मजुराधारीत शेती परवडत नसल्याचेही चित्रण एखाद दुसऱ्या कादंबरीतून येते. उदा. 'बुझ्र्वागमन'.

३९. खेडयाचे जुने स्वरूप आता नष्टप्राय घेण्याच्या मार्गावर असून बहुतांश खेडी , वस्त्या - वस्त्यांच्या रूपात पांगली आहेत. त्याचा उल्लेख उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यात येत नाही.

४०. भूकंप , शेतकऱ्यांच्या आत्महत्या, तंटामुक्त ग्राम अशा कृषिजीवनावर सखोल परिणाम करणाऱ्या विषयांवर कादंबरी लेखन झाले परंतू त्यात सविस्तर चित्रण येत नाही. उदा. 'इथं होतं एक गाव' , 'अंधार इथला संपत नाही'.

४१. बिगरशेतीकरण - शिक्षणाचे कायम विनाअनुदान तत्व , शेतीतील वाढते यांत्रिकीकरण , नातेसंबंधातील ऊसवत चाललेली वीण , स्थलांतर या बाबींचे चित्रण कादंबऱ्यांतून यायला खूप वाव असूनही तसं झालेले दिसत नाही असे निष्कर्ष तिसऱ्या प्रकरणाच्या अखेरीस निघतात.

४२. इ.स.२००० ते इ.स.२०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीतील कृषीवास्तव पाहतांना , 'हिरवा डोंगर', 'धूळपेरणी' , 'सेलझाडा' , 'बारोमास' , 'गराडा' , 'बुर्झ्वागमन' ,'अंधार इथला संपत नाही ', 'रौंदाळा' , 'भूवैकुंठ ', 'बोडखी' , 'धूळपावलं ', 'पांढर' , 'कापूसकाळ' , 'एसईझेड' , 'कुंधा 'अशा कांदबऱ्यांतून कृषिजीवनाचे दर्शन घडते.

४३. इ.स.२००० ते इ.स.२०१० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीतील कृषिवास्तव पाहतांना 'डेअरी ', 'तळतळाट ', 'इथं होतं एक गांव' , 'कथा तंटामुक्त गावाची' , 'वळणाचं पाणी' , ' चाळेगत' , 'झिम पोरी झिम' , 'उचल' , ' इच्छामरण ', 'पाटीलकी' , 'सरपंच ', 'हौशा ', 'निशाणी डावा अंगठा' , 'हाताची घडी तोंडावर बोट' , 'संभूती' , 'झगडा' , 'अंगारकूस ', 'पाणधूई' , 'पाननिवळी' , 'भैरोबाची लेकरं' , 'भिरूड 'अशा काही कादंबऱ्यांतून कृषिवास्तवाचे दर्शन घडत नाही.

४४. उपरोक्त कालखंडातील ज्या कादंबऱ्यामध्ये कृषिवास्तवाचे थोडेबहू चित्रण आलेले आहे. त्या कादंबऱ्यांतून बदलत्या कृषिजीवनाचेही दर्शन घडते. कृषिजीवनातील बदल या कालखंडातील ग्रामीण कादंबरीने टिपलेले असून ते फारसे विस्ताराने आणि तपशिलात जाऊन टिपलेल नाहीत.

४५. उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कांदबऱ्यांमध्ये ग्रामजीवनाचे पुरसे चित्रण झालेले आहे.

४६. उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखांमधून ग्रामीण मानसिकतेचे प्रभावी चित्रण येते.

४७. उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कांदबऱ्यामधून शिक्षण , बेकारी , गाव पातळीवर वाढत चाललेली अशांतता , तुटलेपण , हुंडया सारख्या प्रथा , आरोग्य , कर्जबाजारीपणा , तंटामुक्त गावातील तंटे , जातवार संघटना , गाव पातळीवरील जत्रा यात्रात भांडणे काढण्याची वत्ती प्रवृत्ती , शिकलेल्या मुलाचे घरापासुन तुटत जाणे , एसईझेडसारख्या शेतजमिनी गिळंकृत करणारा पेच , मजूराधारीत शेतीचा वाढता खर्च , भूमी अधिग्रहीत करणारी धोरणे , परप्रांतीय मच्छीमारांची घुसखोरी , अतिरिक्त ऊसाच्या गाळपाचा प्रश्न , कापूस व केळी विक्रीचा प्रश्न , दुष्काळ व त्याची मानव निर्मित तीव्रता , शेती सोडून शहराकडे स्थलांतर , हार्वेस्टरने ऊसतोडणी , आरक्षणांच्या धोरणातून निर्माण झालेले पेच , पाणी टंचाई , दारिद्रय अशा ग्रामीण प्रश्नांची मांडणी करण्यात आलेली आहे.

४८.	उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबरीमधून एकमेकाला मदत करणारी माणसे , भांडणे काढणारी माणसे , खोटया प्रतिष्ठेत जगण्याचा आटापिटा करणारी माणसे , दारीद्रयात आणि संकटात तग धरणारी माणसे , आपापल्या जातीला चिटकून असणारी माणसे , भावकी , गावातील गट तट सहकार्य आणि अडवणूक अशा अनेक पातळयांवरील समाज वास्तवाचे चित्रण झालेले आहे.

४९.	उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कांदबरीला वर्णनातील हुबेहुबपणा , घटना - प्रसंगातील बारकावे , वास्तवाभासी चित्रण , ऐंद्रीय अनुभूती , घटनांमधील दृश्यात्मकता , भाषेचा प्रभावी आणि परिणामकारक वापर , व्यक्तिरेखांची कल्पक रचना आणि स्वभाव चित्रणातील परिणामकारकता यामूळे वाङमयीन कलात्म सौंदर्य प्राप्त झालेले आहे.

५०.	उपरोक्त कालखंडातील प्रकाशित झालेल्या एकूण मराठी वाङमयात गुणवत्ता आणि आशय , वाचकाश्रय , आणि व्यापक जीवनदर्शन या बाबींचा विचार करता ग्रामीण कांदबरीचे स्थान अधिक वरचे आहे असे निष्कर्ष चौथ्या प्रकरणातून हाती येतात.

५१.	उपरोक्त कालखंडातील बहुतांश ग्रामीण कादंबऱ्यांवर पारंपरिक रचनातंत्राचा प्रभाव दिसुन येतो. 'निशाणी डावा अंगठा ' 'बुझ्र्वागमन ' , 'गावठाण', ' चाळेगत' अशा काही कादंबऱ्यामध्ये रचनातंत्राच्या दृष्टीने प्रयोग करण्याचे प्रयत्न झालेले दिसतात.

५२.	उपरोक्त कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचा आशय आणि कथाबंधाचे स्वरूप हे बहुतांश पारंपरिक पध्दतीचेच आहे. गाव पातळीवरील राजकारण , शोषण , दुष्काळ , एसईझेड , अतिरिक्त ऊसाचा प्रश्न, कापसाचा प्रश्न केळी उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न असे काही नवे प्रश्नही या कालखंडातील कादंबऱ्यांच्यामधून समोर येतात. उपरोक्त कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीच्या आशय आणि कथाबंधाचे स्वरूप वास्तवाला संवादी असल्याचे दिसते.

५३.	इ.स.२००० ते इ.स.२०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीच्या निवेदनामध्ये प्रमाण भाषेच्या वापरासोबतच बोलीभाषेच्या वापराचे यशस्वी प्रयोग झालेले दिसुन येतात.

५४.	उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये घटना , प्रसंग , कथानक , व्यक्तिरेखा , वातावरण निर्मिती , या घटकांमध्ये नेमकेपणा असणाऱ्या आणि नेमकेपणाचा अभाव असणाऱ्या कांदबऱ्याही प्रकाशित  झालेल्या असून नेमकेपणा साधला गेलेल्या कादंबऱ्याची संख्या अधिक आहे.

५५.	उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यामधील व्यक्तिरेखांचे चित्रण परिणामकारकतेने करण्याचा लेखकांनी पुरेपुर प्रयत्न केल्याचे दिसते. या कालखंडामधील कादंबरीतील व्यक्तिरेखांचे चित्रण स्पष्ट व अस्पष्ट अशा मिश्र स्वरूपाचे असल्याचे स्पष्ट होते.

५६.	उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबरीमधून राग, द्वेष , प्रिती , मत्सर , विमनस्कता , वैर , अलिप्तता  असुया , दुःख , पश्चाताप या भावनाचे दर्शन घडते. त्यामुळे कादंबरीत जीवंतपणा येऊन परिणामकारकता वाढीस लागलेली दिसते.

५७.	उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबरीतील व्यक्तिरेखांची मनोभूमिका सुष्ट आणि दुष्ट तसेच समिश्र स्वरूपाची असलेली दिसते. अनेक पात्रांची मनोभूमिका अगतिक असल्याचेही दिसते. तर काही व्यक्तिरेखांची प्रगतशिल मनोवृत्ती आढळते. परिणामकारक व्यक्तिरेखा या कालखंडात आढळतात.

५८.	उपरोक्त कालखंडातील मराठी ग्रामीण कांदबरीमधील घटनांचे स्वरूप व्यापक असून ग्रामीण जीवनात प्रत्यक्षात घडू शकतील अशा घटनांची संख्या व वारंवारिता अधिक असल्याचे दिसते. घटना वैविध्यामुळे व घटना वास्तवाच्या पातळीवरील असल्यामूळे या कालखंडातील कादंबऱ्यांना वाचकाश्रय मिळाल्याचे दिसते.

५९.	उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कांदबऱ्यातील नात्यांचे स्वरूप परंपरागत तरीही काहीसे दुभंगत चाललेले दिसते. आई , वडिल आणि मुले या नात्यातील बंध मात्र मजबूत असल्याचे दिसते. काही कादंबऱ्यामधून नाते संबंधाचे चित्रण निटपणाने होत नसल्याचेही दिसते. अशा कादंबऱ्यात प्रसंगपरत्वे आलेल्या नातेसंबंधात दृढपणा दिसून येत नाही. पती पत्नी, आई ,वडिल , मुले भाऊ किंवा बहिणी , दिर जावा , भावजय , सासू सासरे , चुलते , चुलत भाऊ , आजी आजोबा अशा सर्वच नात्यांचे दृढत्व काहीसे सैल झाल्याचे  लक्षात येते. समाजामध्ये नात्यात घडणाऱ्या अभिसरणाचे प्रतिबिंबच या कादंबऱ्यात पडलेले आहे.

६०.	उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यामधील संवादाचे स्वरूप हे प्रमाण भाषेतील संवाद आणि बोली भाषेतील संवाद या प्रकारतले आहे. एखादा दुसरा अपवाद सोडता या कांदबऱ्यांतील संवाद परिणामकारक , कथानकाची गरज म्हणून आलेल , कथानकाची गतिमानता वाढवणारे व व्यक्तिरेखांच्या , व्यक्तिमत्वाचे पैलू खुलवणारे व परिणामकारक ठरणारे आहेत.

६१.	उपरोक्त कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबाऱ्यांची एकूण परिणामकारकता उच्च पातळीवरील दिसत नसली तरी समाधानकारक असल्याचे निश्चित होते.

६२. उपरोक्त कालखंडातील ग्रामीण कादंबरीची बलस्थाने लक्षात घेतांना सर्वच कादंबऱ्या लक्षवेधी , प्रभावी , वाङमय मूल्ये बलस्थानी असणाऱ्या आहेत असे नसून साधारण प्रतीच्या कादंबऱ्यांची संख्या देखील या कालखंडात मोठी आहे. तथापि त्यापैकी काही कादंबऱ्यामध्ये काही ना काही घटक बलस्थानी आहेत. प्रभावी बलस्थाने नसलेल्याने अपवादात्मक कादंबऱ्यांचे लेखन उपरोक्त कालखंडात झाल्याचे दिसते.

६३. उपरोक्त कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबऱ्यांचा आशय विस्तार ही खूपच मर्यादीत असल्याचे दिसते. पुरेसे चिंतन आणि आशयासाठी लागणारे विषयज्ञान , समाजज्ञान आणि भाषाज्ञान , स्वतःच्या दृष्टीकोन यांच्या कमतरतेमुळे बहुतांश ग्रामीण कादंबरीने स्वतः भोवती मर्यादा घालून घेतल्याचे दिसते.

वरिलप्रमाणे संशोधनाचे ठळक निष्कर्ष प्रकरण एक ते पाच मधून हाती येतात.

वरील सर्व विवेचनावरून सार रूपाने आपणास असे म्हणता येईल की , इ.स. १९६० आणि इ.स. १९९० पेक्षा इ.स. २००० नंतरची कादंबरी काही बाबतीत निश्चित वेगळी आहे. या कादंबरीचे पूर्वीच्या कादंबरीहुन वेगळेपण असून काही बाबतीत साधर्म्य देखील आहे. या कादंबऱ्यांचे स्वरूप , तिच्यातील जीवन संघर्ष , मूल्य संघर्ष , राजकीय चित्रण , स्त्री व्यक्तिरेखांचे चित्रण , व्यापकता , कृषी वास्तवाचे चित्रण , ग्रामीण मानसिकतेचे चित्रण , ग्रामीण प्रश्नांची मांडणी , समाजवास्तव आणि सौंदर्य तत्त्वाचे स्वरूप , आशय - कथाबंधाचे स्वरूप , भाषा शैली , नेमकेपणा , व्यक्तिरेखा त्यांची मनोभूमिका , नात्यांचे स्वरूप , घटनांचे स्वरूप , एकूण परिणामकारकता , बलस्थाने, मर्यादा या बाबींचा विचार करता संशोधन कालखंडातील कादंबऱ्या वेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. हे कोणालाही मान्य व्हावे.

प्रबंधाच्या अखेरीस एकंदर विवेचनाचा उपसंहार सहाव्या प्रकरणात केलेला आहे. तसेच परिशिष्ट, साधन ग्रंथसूची , संदर्भ ग्रंथ सूची , नियतकालीक सूची , विषयनाम सूची , व्यक्तिनाम सूची जोडलेली आहे.

मार्गदर्शक | अभ्यासक

(डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे) | (कैलास रायभान दौंड)

दिनांक : /१२/२०१४

स्थळ : औरंगाबाद

## साधन ग्रंथ सुची


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | इथं होत एक गाव | : | रा.रं. बोराडे | : | २००० |
| २) | हिरवा डोंगर | : | दि.र. जायभाये | : | २००० |
| ३) | धूळपेरणी | : | शेषराव मोहिते | : | २००१ |
| ४) | ऐसे कुणबी भूपाळ | : | भारत काळे | : | २००१ |
| ५) | सेलझाडा | : | नामदेव चं. कांबळे | : | २००१ |
| ६) | हाताची घडी तोंडावर बोट | : | माधव कोंडविलकर | : | २००१ |
| ७) | बारोमास | : | सदानंद देशमुख | : | २००२ |
| ८) | गराडा | : | भीमराव वाघचौरे | : | २००२ |
| ९) | जोहड | : | सुरेखा शहा | : | २००२ |
| १०) | गव्हाणी | : | शांता जोशी | : | २००२ |
| ११) | हौशा | : | जयवंत अवघडे | : | २००४ |
| १२) | पाणधूई | : | कैलास दौंड | : | २००४ |
| १३) | संभूती | : | बाबु बिरादार | : | २००४ |
| १४) | बारदाना | : | प्रकाश देशपांड केजकर | : | २००४ |
| १५) | गावठाण | : | कृष्णात खोत | : | २००५ |
| १६) | पाटीलकी | : | बाबाराव मुसळे | : | २००५ |
| १७) | निशाणी डावा अंगठा | : | रमेश इंगळे उत्रादकर | : | २००५ |
| १८) | झगडा | : | भाऊसाहेब सावंत | : | २००५ |
| १९) | बखर एका खेड्याची | : | जनार्दन वाघमारे | : | २००५ |
| २०) | भाऊबंद | : | विजय जावळे | : | २००६ |
| २१) | डेअरी | : | साईनाथ पाचारणे | : | २००६ |
| २२) | पाडा | : | अशोक कौतिक कोळी | : | २००६ |
| २३) | साखर फेरा | : | मोहन पाटील | : | २००६ |
| २४) | गोठण | : | रावजी राठोड | : | २००७ |
| २५) | एसईझेड | : | शंकर सखाराम | : | २००७ |
| २६) | भिरूड | : | गणेश आवटे | : | २००७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २७) | अंगारकूस | : | भीमराव वाघचौरे | : | २००७ |
| २८) | चिखलवाटा | : | सुरेंद्र पाटील | : | २००७ |
| २९) | बुर्झ्वागमन | : | दिवाकर चौधरी | : | २००७ |
| ३०) | वळणाचं पाणी | : | रा.रं. बोराडे | : | २००७ |
| ३१) | पाणनिवळी | : | व.बा. बोधे | : | २००७ |
| ३२) | भैरोबाची लेकरं | : | व.बा. बोधे | : | २००७ |
| ३३) | आरंबळ | : | रा.गो. चवरे | : | २००७ |
| ३४) | इच्छामरण | : | आनंद पाटील | : | २००८ |
| ३५) | अंधार इथला संपत नाही | : | भालचंद्र देशपांडे | : | २००८ |
| ३६) | भूवैकुंठ | : | किशोर सानप | : | २००८ |
| ३७) | तळतळाट | : | शिवाजी देशमुख | : | २००८ |
| ३८) | रौंदाळा | : | कृष्णात खोत | : | २००८ |
| ३९) | पांढर | : | रवींद्र शोभणे | : | २००९ |
| ४०) | बोडखी | : | प्रतिमा इंगोले | : | २००९ |
| ४१) | दात | : | सरदार जाधव | : | २००९ |
| ४२) | झिम पोरी झिम | : | बालाजी मदन इंगळे | : | २००९ |
| ४३) | चाळेगत | : | प्रवीण दशरथ बांदेकर | : | २००९ |
| ४४) | कापूसकाळ | : | कैलास दौंड | : | २००९ |
| ४५) | धूळपावलं | : | महेंद्र कदम | : | २००९ |
| ४६) | रिक्त अतिरीक्त | : | रा.रं. बोराडे | : | २०१० |
| ४७) | सरपंच | : | जयवंत अवघडे | : | २०१० |
| ४८) | कुंधा | : | अशोक कौतिक कोळी | : | २०१० |
| ४९) | कथा एका तंटामुक्त गावाची | : | रा.रं. बोराडे | : | २०१० |
| ५०) | उचल | : | बाळासाहेब गर्कळ | : | २०१० |

--------